# दिवाणी चौकशी अर्ज क.२१/२०१० मधील नि.क.४५ वरील आदेश

संजय रामचंद्र सोनावळे वगैरे ... *अर्जदार*

*वि.*

*अमृता हरी सोनावळे वगैरे ... सामनेवाला*

१. सदरचा अर्ज ०५/०१/२०१० रोजीच्या अनुक्रमांक ५३/२०१० अन्वये नोंदविलेल्या खरेदीच्या दस्तऐवजाच्या सहीशिक्याच्या प्रतीस दुय्यम पुरावा म्हणुन परवानगी मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जामध्ये कथन की, अर्जदार यांनी सामनेवाला क.१, ३ व ४ यांच्यामधील ०५/०१/२०१० रोजीच्या खरेदीखताच्या सहीशिक्याची नक्कल दाखल केली आहे. सदरच दस्त अर्जदार यांचकडे असणे शक्य नाही. सदरचा दस्त सामनेवाला यांनी नाकरलेला नाही. सदरच दस्त चौकशीत अभिलेखावर आल्यास न्यायालयास निकाल देण्यास अत्यंत सुलभ जाणार आहे. त्यामळे त्याचे साक्षांकित प्रतीस दुय्यम पुरावा म्हणुन ग्राहय धरण्यात यावे व तशी परवानगी मिळावी. अर्जदाराने कथनाचे पृष्ठयर्थ निशाणी क्र.४६ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

३. सदर अर्ज दिनांक २९/०८/२०१६ रोजी दाखल करण्यात आला परंतु आजतागायत सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले नाही म्हणुन आज ‘सामनेवाला यांचे म्हणणे नाही’ असे समजुन आदेश पारीत करण्यात येत आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदाराने निशाणी क्र.४ चे लिस्टापोटी अनु.क्र.६ वर सदर खरेदीखताची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. ज्याचे अवलोकन करता सदरचे खरेदीखत सामनेवाला क्र.२ ते ४ यांनी सामनेवाला क्र.१ यांच्या नावे कुलअखत्यारी म्हणुन सामनेवाला क्र.२ यांच्या नावे करून दिले आहे. अर्जदार त्यास पक्षकार नाही.

५. भारतीय पुरावा कायदा, कलम ६५ चे अवलोकन करता अर्जदाराचे सदरचे प्रकरण पोटकलम 'क' मध्ये बसते. सोयीसाठी सदरचे कलम खाालीलप्रमाणे नमुद करत आहेत.

**<u>कलम ६५ दस्तऐवजासंबंधी दुयम पुरावा देता येईल असे प्रसंग:</u>**

*"पुढील प्रसंगी दस्तऐवजाच्या अस्तित्वाचा, स्थितीचा किंवा मजकुराचा दुय्यम पुरावा देता येईल:*

*(क) ज्या व्यक्तीविरूध्द दस्तऐवज शाबीत करावयाचा आहे तिच्या,अथवा जी व्यक्ती त्या न्यायालयाच्या आदेशिकेच्या कक्षेबाहेर आहे किंवा त्या आदेशिकेच्या अधीन नाही तिच्या, अथवा*

*जी व्यक्ती तो दस्तऐवज हजर करण्यास कायद्याने बांधलेली आहे तिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली मूळ लेख असल्याचे दाखवण्यात आले असेल किंवा तसे दिसत असेल आणि कलम ६६ मध्ये उल्लेखिलेली नोटीस देण्यात आल्यानंतर अशी व्यक्ती तो हजर करीत नाही''*

या कलमाचे अवलोकन करता यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कलम ६६ प्रमाणे नोटीस देणे गरजेचे आहे. पण अभिलेखाचे अवलोकन करता अशी नोटीस दिली किंवा कसे याचा बोध होत नाही. अर्जदाराने तशा स्वरूपाचा पुरावा सादर केला नाही. कलम ६६ च्या तरतुदीचे पालन करण्यात आलेले नाही. त्यामुळे या घडीला हा अर्ज टिकणारा नाही. सदरचा अर्ज सद्यस्थितीत कायदेशीर नसल्याने नाकारण्यात येत आहे. कारणे आदेश -

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

कर्जत (शु.भि.यादव)
दि.३०/०१/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.